# माध्यमिक

**मराठी** (204)

**वेळ** : **तीन तास** **एकूण गुण**: **१००**

**सूचना**:

१) **या प्रश्नपत्रिकेत एकूण ३७ प्रश्न आहेत आणि सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.**

२) **प्रश्नपत्रिकेत दोन विभाग आहेत**, **विभाग- अ आणि विभाग - ब**

३) **विभाग अ' मध्ये वस्तुनिष्ठ / बहुपर्यायी प्रश्न आहेत. तर विभाग - ब मध्ये विषयनिष्ठ/ वर्णनात्मक प्रश्न आहेत. विभाग अ-५० गुण व विभाग-ब ५० गुण आहेत = १०० गुण**

४) **विभाग-अ मध्ये एकूण प्रश्न २७ आहेत त्यात प्रश्न क्र. १ ते १२ गदय**, **प्रश्न १३ ते २० पद्य आणि प्रश्न २१ ते २७ व्याकरणावर आधारित आहे**

५) **विभाग-ब मध्ये एकूण २८ ले ३७ आहेत. त्यात प्रश्न २८ ते ३० गद्य-पद्यवरील,प्रश्न क्र. ३१, ३२ व्याकरण, प्रश्न क्र. ३३ व ३४ उतऱ्यावरील प्रश्न आणि प्रश्न क्र ३५ ते ३७ लेखनकौशल्यावर आधारित आहेत जसे की निबंध, पत्रलेखन, सारांश लेखन इ.**

| प्रश्न क्रमांक | विभाग-अ (वस्तुनिष्ठ बहुपर्यायी प्रश्न) | गुण वितरण | एकूण गुण |
|---|---|---|---|
| | दिलेल्या पर्यायांमधून अचूक पर्याय शोधून खालील प्रश्नांची उत्तरे लिहा. | | |

| | | | |
|---|---|---|---|
| प्र.१ | भारतीयांनी टिळकांना बहाल केली पदवी कोणती ?<br>अ) महात्मा ब) लोकमान्यांचे क) श्रीमान ड) यापैकी नाही<br>किंवा<br>साने गुरुजींचे मराठीतील गाजलेचे पुस्तक कोणते ?<br>अ) श्यामची आई ब) बनगरवाडी क) स्मृतिचित्रे ड) गणगोत | | १ |
| प्र.२ | आपल्याला ज्ञान देणारा पहिला गुरु कोण ?<br>अ) पिता ब) शिक्षक क) माता ड) ग्रंथ<br>किंवा<br>हेडगेवारांचे वैद्‌यकिय शिक्षण कोठे झाले?<br>अ) नागपूर ब) कोलकाता क) यवतमाळ ड) मुंबई | | १ |
| प्र.३ | नागूची झोप कशी होते?<br>अ) राक्षसी ब) देवगुणी क) माणसारखी ड) यापैकी नाही<br>किंवा<br>फुलेंचा प्रसिद्ध ग्रंथ कोणता?<br>अ)काळेपाणी ब) शेतक-याचा आसूड क) ययाति ड) यापैकी नाही | | १ |
| प्र. ४ | चूक की बरोबर सांगा (कोणतेही तीन) | | ३ |
| १) | मराठीतील मराठी भाषा इंग्रजांनी वाढवली | १ | |
| २) | बलसागर भारत होवो' या कवितेची मध्यवर्ती कल्पना | १ | |

| | | | |
|---|---|---|---|
| | म्हणजे भारताला बलशाली आणि वैभवसंपन्न करणे ही होय | | |
| ३) | लक्ष्मीबाई टिळक यांनी स्मृतिचित्रे' हे आत्मचरित्र लिहीले | १ | |
| ४) | नागूला झोपेतून उठवून चोराने ट्रंकेची किल्ली घेतली | १ | |
| प्र.५ | रिकाम्या जागा भरा (कोणत्याही तीन) | | ३ |
| १) | लोकमान्य टिळकांनी....................... हे नियतकालिक /वृत्तपत्र सुरु केले | | |
| २) | नवीन गोष्टींचे किंवा उत्पादन निर्माणकर्ता ....................... हा आहे | | |
| ३) | ...................... हा नागू गवळ्याचा हातखंडा विषय होता. | | |
| ४) | डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांनी ................. या संघटनेची स्थापना केली | | |
| ५) | महर्षी कर्वे है.................... वर्षे जगले | | |
| प्र.६ | जोड्या लावा - पाठ आणि पाठाचे लेखक यांचे जोड्या लावा | | ४ |
| | (पाठ) 'अ ' गट (लेखक) 'ब ' गट | | |
| १) | झोप व्ही.एस. खांडेकर | १ | |
| २) | महर्षीचे गर्वारोहण दिलीप धारूरकर | १ | |
| ३) | पर्वत शिखर द. मा. मिरासदार | १ | |

| | | | |
|---|---|---|---|
| **४)** | **श्री आचार्य अत्रे** | **१** | |
| **प्र. ७** | **दिलेल्या पर्यायांमधून अचूक पर्याय निवडून वाक्य पूर्ण करा** | | **२** |
| | **भारतातील स्त्रियांनी .................काम आधीक केले आहे**<br>**अ) धर्मरक्षणाचे ब) संस्काराचे क) व्रतवैकल्याचे ड) स्वयंपाकाचे** | **१** | |
| | **तल्लीन होणे म्हणजे.................**<br>**अ) एकरूप होणे ब)दुःखी होणे क) व्याकुळ होणे ड) यापैकी नाही** | **१** | |
| **प्र.८** | **टिळकांच्या मते शास्त्र्यांनी संतांचे हाल केले कारण**<br>**अ) शास्त्र्यांनी संतांना नावे ठेवली ब) शास्त्र्यांनी मराठी भाषेचा पुरस्कार केला नाही क) शास्त्री उद्धट होते ड) यापैकी नाही** | | **१** |
| **प्र.९** | **लग्नानंतर नागूला दिवसा झोप येत नसे कारण...**<br>**अ) त्याच्या मागे प्रपंच लागला होता ब) घरात मुलांचा गोंधळ होता क) त्याला व्यायामाला वेळ द्यावा लागत होता ड) यापैकी नाही** | | **१** |
| **प्र.१०** | **पत्र लेखनासाठी अनुरूप -वापरल्याने पत्र परिणामकारक होते**<br>**अ) शब्द ब) भाषाशैली क) भावना ड) आशय** | | **१** |

| | | | |
|---|---|---|---|
| प्र.११ | इंद्रिय निग्रह करणे म्हणजे............<br>अ) इंद्रियावर संयम ठेवणे ब) आग्रह करणे क) स्वैर राहणे ड) यापैकी नाही | | १ |
| प्र.१२ | शेतकरी शेतसारा देत नाही कारण<br>अ) शेतसारा माफ होणार होता ब) शेतसारा देण्यासाठी त्याचेकडे पैसे -<br>नव्हते क) शेतसारा देण्याची त्याची इच्छा नव्हती ड) त्याला शेतसारा बुडवायचा होता | | १ |
| प्र.१३ | दिलेल्या पर्यायांमधून अचूक पर्याय निवडून खालील प्रश्नांची उत्तरे लिहा. | | |
| | बलसागर होबा भारत होवो' या कवितेत देशाला स्वातंत्र्य मिळवून<br>देण्यासाठी मदतीसाठी कोणाला आवाहन केले आहे?<br>अ) देशबांधवांना ब) नातेवाईकांना क) तरुणांना ड) कार्यकर्त्यांना<br>किंवा<br>तक्यातील बादके कशी होती ?,<br>अ) आनंदी ब) सुरेख क) पांढरीशुभ्र ड) छोटी छोटी | | १ |
| प्र.१४ | आता ही कावल कवी ढसाळ यांनी आपल्या कोणत्या काव्यसंग्रहातून घेतली आहे ?<br>अ) झेंडूची फुले ब) गोलापिठा क) पत्री ड) यापैकी नाही | | १ |

| | | | |
|---|---|---|---|
| | **किंवा**<br>**रणभूमीवर उत्साह वाढवणारे वाद्य कोणते** ?,<br>**अ) दुंदुभी  ब) ढोल  क) ताशा ड) ढोलकी** | | |
| **प्र.१५** | **चूक की बरोबर सांगा (कोणतेही तीन)** | | **३** |
| **१)** | **बलसागर भारत होवो' या कवितेची मध्यवर्ती कल्पना म्हणजे भारताला वैभवसंपन्न बलशाली करणे ही होय.**<br>__________ | | |
| **२)** | **पसायदान संत तुकाराम महाराजांनी दिले.**<br>__________ | | |
| **३)** | **वीरपत्नी आपल्या पतीच्या भाळी विजयतिलक लावणार आहे.** ______ | | |
| **४)** | **निसर्गातील सहा  ऋतूंचे सोहळे पाहून निराशा येते.**<br>____________ | | |
| **प्र.१६** | **रिकाम्या जागा भरा (कोणत्याही तीन)** | | **३** |
| **१)** | .......... **तिमिर जावो** | | |
| **२)** | **आहे**......... **वेडे पिल्लू तयात एक** | | |
| **३)** | **अहो**.......... **करी कृपा** | | |
| **४)** | **या जन्मावर, या जगण्यावर शतदा** ............. | | |
| **प्र.१७** | **कविता आणि काव यांच्या जोड्या लावा** | | **४** |
| | **(कविता) 'अ' गट** **(कवी) 'ब' गट** | | |
| | **पसायदान** **मंगेश पाडगावकर** | | |

| | | | |
|---|---|---|---|
| | एका तळ्यात होती संत ज्ञानेश्वर | | |
| | या जगण्यावर शांता शेळके | | |
| | पहा टाकले पुसुनी डोळे ग. द. माडगूळकर | | |
| प्र. १८ | वाक्प्रचाराचा अर्थ लिहा- योग्य पर्याय निवडून | | १ |
| | हातात कंकण बांधणे<br>अ) हातात बांगड्या भरणे ब) ध्येयपूर्तीसाठी शपथ घेणे<br>क) कष्ट करणे ड) यापैकी नाही | | |
| प्र.१९ | दिलेल्या पर्यायांमधून अचूक पर्याय निवडून रिकाम्या आगा भरा | | १ |
| | आता आभाळमुका घेणा-या ............. सुरुंग लावलाच पाहिजे<br>अ) इमारतींना ब) झाडांना क) हवेल्यांना<br>ड)पर्वतारीखरांना | | १ |
| प्र.२० | ज्ञानेश्वरांनी 'विश्वात्मके' हे विशेषण कोणासाठी वापरले?<br>अ) प्राण्यांसाठी ब) देवासाठी क) दुष्टांसाठी ड) यापैकी नाही | | १ |
| प्र.२१ | दिलेल्या पर्यायांमधून अचूक पर्याय निवडून खालील प्रश्नांची उत्तरे लिहा. | | १ |
| | पत्राचे मुख्य दोन प्रकार कोणते ? | | |

| | | | |
|---|---|---|---|
| | अ) धीर व अभिनंदन ब) व्यक्तिगत व व्यावसायिक<br>क) तक्रार व निमंत्रणपर<br>किंवा<br>पुढील वाक्यातील काळ ओळखा<br>आकाशात काहे ढंग आहेत<br>अ) वर्तमानकाळ ब) भूतकाळ क) भविष्यकाळ ड) यापैकी नाही | | |
| प्र-२२ | सम, सारखा, जसा, गल यासारखे शब्द या अलंकारात येतात<br>अ) उत्प्रेक्षा ब) उपमा क)यमक ड)अनुप्रास<br>किंवा<br>नामाऐवजी येणाऱ्या शब्दाला ................ म्हणताल<br>अ) विशेषण ब) क्रियापद क)सर्वनाम ड) यापैकी नाही | | १ |
| प्र.२३ | चूक की बरोबर सांगा (कोणतेही तीन) | | ३ |
| अ) | <u>भाषा</u> ही विचार, भावना व्यक्त करण्याचे प्रभावी साधन आहे | | |
| ब) | <u>लेखन</u> करताना कसेही लिहिले तरी चालते | | |
| क) | दोन व्यक्ती किंवा संस्था यांच्यात दळणळण आणि संवाद निर्माण करणारे पत्र हे प्रभावी माध्यम आहे | | |
| ड) | कोणतीही गोष्ट / विचार जास्त वेळेत विस्तृत शब्दात मोडणे म्हणजे <u>सारांश लेखन</u> होय | | |

| | | | |
|---|---|---|---|
| प्र.२४ | दिलेल्या पर्यायांमधून अचूक शुद्ध शब्द ओळखा (कोणते ही तीन)<br>१) अ) तिमीर ब) तीमीर क) तिमिर ड) तीमिर<br>२) अ) नीसर्ग ब) निर्सर्ग क) नीर्सग ड) निसर्ग<br>३) अ) मात्रंड ब) मारतंड क) मार्तंड ड) मांतर्ड<br>४) अ) वीश्वात्मक ब) विश्वात्मक क) विषवात्मक<br>ड) विशवात्मक | | ३ |
| प्र. २५ | दिलेल्या पर्यायांमधून अचूक पर्याय निवडून खालील प्रश्नांची उत्तरे लिहा | | ३ |
| | अ) शब्दांच्या एकूण किती जाती आहेत<br>अ) आठ ब) पाच क) नऊ ड) तीन-<br><br>ब)नामाबद्दल विशेष माहिती सांगणाऱ्या शब्दास..... म्हणतात.<br>अ) क्रियापद ब) विशेषणाचे क) सर्वनाम ड)यापैकी नाही<br>क) आई आणि वडील हे द्वंद्वाचे द्वाचे उदाहरण आहे.<br>अ) द्विगु ब) समाहार अ) इतरेतर ड)वैकल्पिक | | |
| प्र. २५ | सूचनेप्रमाणे लिहा<br>'प्र' व 'सु' हे उपसर्ग असलेले प्रत्येकी दोन शब्द लिहा<br>प्र- १)____________ २) ____________<br>सु'- १)____________ २) ____________ | | २ |

| | | | |
|---|---|---|---|
| | किंवा<br>समूहदर्शक शब्द लिहा<br>गुरांचा -<br>पुस्तकांचा - | | |
| प्र.२७ | प्राणी आणि आवाज यांच्या जोड्या लावा (कोणतेही २) | | २ |
| | (प्राणी) 'अ' गट (आवाज) 'ब' गट | | |
| | वाघ हंबरणे | | |
| | गाय गर्जना | | |
| | सिंह डरकाळी | | |
| | विभाग- ब (विषयनिष्ठ / वर्णनात्मक प्रश्न) | | |
| प्र- २८ | खालीलपैकी कोणत्याही तीन प्रश्नांची 20 ते 30 शब्दांत उत्तरे लिहा.<br>अ) लक्ष्मीबाई टिळक यांची व्यवहारात वागण्याची तत्वे कोणती ?<br>ब) शास्त्रात आईचा गौरव कोणत्या शब्दांत केला आहे ?<br>क) लग्नापूर्वी नागूचा कार्यक्रम काय असे ?<br>ड)सनातनी समाजाच्या दृष्टीने महर्षी कर्वे यांनी कोणते महापातक केले? | | ६ |
| प्र- २९ | खालीलपैकी कोणत्याही तीन प्रश्नांची 20 ते 30 शब्दांत उत्तरे लिहा.<br>अ) बलसागर भारत होवो' कवीने कोणती प्रतिज्ञा केली | | ६ |

| | | | |
|---|---|---|---|
| | **आहे** ?<br>**ब**) **ज्ञानेश्वरांनी देवाकडे कोणते दान मागितले आहे** ?.<br>**क**) **वेलीवर उमलणारे फूल पाहून कवीला काय वाटते**?<br>**ड**) **वीरपत्नी आपल्या पतीला रणांगणावर कसे जाण्यास सांगत आहे** ? | | |
| **प्र.३०** | **खालीलपैकी कोणत्याही तीन प्रश्नांची उत्तरे ३० ते ५० शब्दांत किहा**<br>**अ**) **भाषेच्या विकासासाठी सुशिक्षितांनी कोणती कामे केली पाहिजे पाहिजे**?<br>**ब**) **बदकाच्या उदाहरणातून कवीने मानवी स्वभावाचे कोणते विशेष सांगितले**?,<br>**क**) **महात्मा फुले यांनी शेतकऱ्याचे छायाचित्र कसे रेखाटले आहे** ?<br>**ड**) **आला**'. ' **या कवितेत सूर्याकडे पाठ फिरवून शतकांचा प्रवास कुणी व कसा केला**? | | **९** |
| **प्र.३१** | **विरामचिन्हे म्हणजे काय** ? **विरामचिन्हाचे कोणतेही दोन प्रकार सांगा**<br>**किंवा**<br>**अ**) **खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा**<br>**१**) **आयात** **३) सुंदर**<br>**२**) **स्वतंत्र** **४) सत्य** | **२** | **४** |

| | | | |
|---|---|---|---|
| | ब) खालील शब्दांचे प्रत्येकी दोन समानार्थी शब्द लिहा<br>१) तोंड __________ ______________<br>२) पैसा __________ _______________ | २ | |
| प्र.३२ | अ) खालील म्हणींचा अर्थ लिहा<br>१) इकडे आड तिकडे विहीर<br>२) कामापुरता मामा<br>किंवा<br>शब्दसमुहाबद्दल एक शब्द सूचवा<br>१) शंभर वर्षे आयुष्य लाभलेला<br>२) आजिबात शत्रू नसलेला<br>ब)आळा घालणे- या वाकप्रचाराचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा. | | ४ |
| प्र.३३ | खालील उतारा वाचून त्यावरील प्रश्नांची उत्तरे तुमच्या शब्दात लिहा<br>महात्मा जोतीबा फुले म्हणतात, ज्याचे मन सत्याने पवित्र झाले आहे, तो जगातील सर्वात पवित्र माणूस, ज्या मनुष्याला मनाच्या पावित्र्याचे महत्व कळत नाही, तो मनुष्य धरणीस भार ठरतो, निर्दोष आणि उद्योगी जीवन मनुष्याला आरोग्य आणि संपत्ती देते. आळशी मनुष्य हा दुष्ट असतो. तो समाजाचा शत्रु बनलो. तो | | ३ |

| | | | |
|---|---|---|---|
| | **कधीही सुखी होत नाही उद्योगी आणि शुद्ध चारित्र्याचा मनुष्य हा गरिबांचा वाली असतो. तो अनेकांना सुखी करतो. सत्यप्रेमी, निर्मळ मन आणि शांत हृदय यातून धैर्य निर्माण होते. धैर्यशील मनुष्य हालअपेष्टा सहन करतो आणि संकटावर मात करतो.**<br>**प्रश्न**:<br>1) **जगातील सर्वात पवित्र माणूस कोणास म्हटले आहे** ?,<br>**किंवा**<br>**२) मनुष्यास आरोग्य व संपत्ती कशामुळे लाभते** ?<br>**धैर्यशील मनुष्याची वैशिष्टये कोणती**?.<br>**किंवा**<br>**समाजाचा शत्रू कोण बनतो** ?<br>3) **गरिबांचा वाली कोण असतो** ? | | |
| **प्र.३४** | **खालील पक्ष्यांग वाचून त्यावरील प्रश्नांची उत्तरे तुमच्या शब्दांत लिहा**<br>**या जन्मावर, या जगण्यावर शतदा प्रेम करावे चंचल वारा, या जलधारा, भिजली काही माती हिखे हिरखे प्राण तशी ही रुजून आली पाती फुले लाजरी बघुन कुणाचे हळवे ओठ स्मरावे या जन्मावर जा या जगण्यावर शतदा प्रेम करावे**<br>**प्रश्न** | | **३** |

| | | | |
|---|---|---|---|
| | प्र.१) या जगण्यावर कसे प्रेम करावे<br>किंवा<br>वारा कसा आहे<br>प्र.२) पाती कशाप्रमाणे रुजून आली आहेत<br>किंवा<br>फुले कशी आहेत?<br>प्र.३) ही कविता कोणी लिहिली | | |
| प्र.३५ | पुढील उताऱ्याचा एक तृतियांश सारांश तुमच्या शब्दात लिहा व उताऱ्यास योग्य शीर्षक दया.<br>डॉ-बाबासाहेब आंबेडकर यांचे पूर्ण नाव भीमराव रामजी आंबेडकर त्यांचा जन्म १४ एप्रिल १८९१ साली एका अस्पृश्य समाजात झाला. रामजी सपकाळ सपकाळ हे बाबासाहेबांचे वडील तर आईचे नाव भीमाबाई होते. बाबासाहेबांचे उच्चारीक्षण परदेशात झाले. लंडन विद्यापीठगतून ते बॅरिस्टर झाले. शोषित, वांचित समाजाचा उद्धार करणेचे प्रमुख कार्य त्यांनी केले. अस्पृश्य समाजात जागृती निर्माण केली. शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' हे त्यांचे घोषवाक्य होते. बाबासाहेबांना दलितांचे देव' म्हणतात, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकाम म्हणून बाबासाहेब ओळखले जातात. | | ४ |

| | | | |
|---|---|---|---|
| प्र.३६ | तुमचा मित्र जिल्हा पातळी धावण्याच्या स्पर्धेत पहिला आल्याबद्दल त्याचे अभिनंदन करणारे पत्र लिहा.<br>किंवा<br>तुमच्या परिसरात भटक्या कुत्र्यांच्या उपद्रवामुळे वाढलेल्या त्रासासाठी आयुक्त, महानगर पालिका, आरोग्य विभाग यांचेकडे तक्रार अर्ज लिहा. | | ५ |
| प्र.३७ | खालीलपैकी एका विषयावर १५० ते २०० शब्दांत निबंध लिहा<br>1) मला देव भेटला तर<br>2) माझा आवडता खेळ<br>3) शिक्षणाचे महत्त्व<br>४) नदीचेआत्मवृत्त | | ६ |
| | | | |

(स्मिता एस. तुपे)

**माध्यमिक**

**मराठी (२०४)**

**वेळ : तीन तास** **MARKING SCHEME** **एकूण गुण: १००**

| | प्रश्न क्रमांक | अपेक्षित महत्वाचे मुद्दे | गुण वितरण | एकूण गुण |
|---|---|---|---|---|
| | | विभाग -अ (वस्तुनिष्ठ बहुपर्यायी प्रश्न) | | |
| | १ | ब-लोकमान्य | | १ |
| | | अ-श्यामची आई | | |
| | २ | क-माता | | १ |
| | | ब -कोलकाता | | |
| | ३ | अ-राक्षसी | | १ |
| | | ब- शेतक-याचा आसूड | १ | |
| | ४ | १) चूक | १ | ३ |
| | | २) बरोबर | १ | |
| | | ३) बरोबर | १ | |
| | | ४) चूक | १ | |
| | ५ | १)केसरी | १ | ३ |
| | | २) ब्रह्मदेव | १ | |
| | | ३) झोप | १ | |
| | | ४)राष्ट्रीय स्वयंसेवक संघ | १ | |
| | | ५) एकशे पाच | १ | |
| | ६ | झोप – द. मा. मिरासदार | १ | ४ |
| | | महर्षीचे गर्वारोहण- आचार्य अत्रे | १ | |
| | | पर्वत शिखर - दिलीप धारूरकर | १ | २ |
| | | श्री - आचार्य अत्रे | १ | |
| | ७ | अ) संस्काराचे | १ | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | ब) एकरूप होणे | | |
| | ८ | ब) दशास्त्र्यांनी मराठी भाषेचा पुरस्कार केला नाही | | १ |
| | ९ | अ) त्याच्या मागे प्रपंच लागला होता | | १ |
| | १० | ब) भाषा शैली | | १ |
| | ११ | अ - इंद्रियावर संयम ठेवणे | | १ |
| | १२ | ब- शेतसारा देण्यासाठी त्याचेकडे पैसे नव्हते | | १ |
| | १३ | अ- देशबांधवांना | १ | १ |
| | | ब-सुरेख | १ | १ |
| | १४ | अ-गोलापिठा | १ | १ |
| | | ब- दुंदुभी | १ | |
| | १५ | १) बरोबर | १ | ३ |
| | | २) चूक | १ | |
| | | 3) बरोबर | १ | |
| | | ४)चूक | | |
| | १६ | १) दुरितांचे | १ | ३ |
| | | २) कुरूप | १ | |
| | | 3) कंकण | १ | |
| | | ४) प्रेम करावे | १ | |
| | १७ | पसायदान - संत ज्ञानेश्वर | | ४ |
| | | एका तळ्यात होती - ग. दि. माडगूळकर | | |
| | | या जगण्यावर - मंगेश पाडगावकर | | |
| | | पहा टाकले पुसुनी डोळे - शांता शेळके | | |
| | १८ | ध्येयपूर्तीसाठी शपथ घेणे | | १ |
| | १९ | क-हवेल्यांना | | १ |
| | २० | ब- देवासाठी | | १ |
| | २१ | ब-व्याक्तगत व व्यावसायिक पत्र | | १ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | अ- वर्तमानकाळ | | |
| | २२ | ब-उपमा | | १ |
| | | क - सर्वनाम | | |
| | २३ | १) बरोबर | १ | ३ |
| | | २) चूक | १ | |
| | | 3) बरोबर | १ | |
| | | ४)चूक | १ | |
| | २४ | १) क)-तिमिर | १ | |
| | | २) ड)- निसर्ग | १ | ३ |
| | | 3) क)- मालैंड | १ | |
| | | ४) ब)- विश्वात्मक | १ | |
| | २५ | अ)-आठ | १ | ३ |
| | | ब)- विशेषण | १ | |
| | | क)-इतरेतर द्वंद्व | १ | |
| | २६ | अ)- १)प्रसिध्द २) प्रगती | | २ |
| | | ब)-१) सुविचार २) सुगंध | | |
| | | गुरांचा कळप | | |
| | | पुस्तकांचा गठ्ठा | | |
| | २७ | वाघ - डरकाळी | | २ |
| | | गाय - हंबरणे | | |
| | | सिंह - गर्जना | | |

## माध्यमिक

## मराठी (२०४)

**वेळ : तीन तास** **मार्किंग योजना** **एकूण गुण: १००**

| | प्रश्न क्रमांक | अपेक्षित महत्वाचे मुद्दे | गुण वितरण | एकूण गुण |
|---|---|---|---|---|
| | | विभाग -'ब' (विषयनिष्ठ /वर्णनात्मक प्रश्न) | | |
| | प्र. २८ | कोणतेही तीन प्रश्न | | ६ |
| | अ) | आगगाडील बसले म्हणजे बसल्या जागेवरून हळू नये, स्टेशनवर गाडी. चुकेल म्हणून चार तास आधी येऊन बसावे. कोणी आसन्न मरण असेल तरच तारा कराव्यात, इतरवेळी करू नयेत अशी लक्ष्मीबाईंची व्यवहारात वागण्याची तत्वे होती | | |
| | ब) | धर्मशास्त्रात आईच्या स्थानाला अग्रगण्य मानले आहे. दहा उपाध्यायांच्या बरोबर एक शिक्षक, शंभर शिक्षिकांबरोबर एक पिता व हजार पित्यांपेक्षाही आई श्रेष्ठ आहे अशा तऱ्हेने शास्त्रात आईचा गौरव. | | |
| | क) | नागू गवळी पैलवान होता. पहाटे उठून व्यायाम, नंतर दूध पिऊन झोपणे नंतर परत उठून दुपारचे जेवण करून झोप परत संध्याकाळी मेहनत करून रात्रीचे जेवण करून झोपायचा. झोप हा नागूचा प्रिय विषय असे अशारितीने लग्नापूर्वी नागू राजा माणूस होता. | | |
| | ड) | महर्षी कर्वे यांनी आपल्या सामाजिक कार्याला प्रारंभ केला ते एका विधवेशी पुनर्विवाह करून. तत्कालीन समाजाला हे अमान्य होते. एका विधवेशी पुनर्विवाह करणे हेच त्या सनातनी समाजाच्या दृष्टीने महापातक होते. | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | प्र. २९ | कोणतेही तीन प्रश्न | | ६ |
| | अ) | भारत देशाला मी वैभवाच्या शिखरी चढवीन, भारताला मी स्वातंत्र्य मिळून देईन आणि देशातील अज्ञानाच्या व गुलामगिरीच्या घोर अंधाराला मी नष्ट करून टाकीन ही प्रतिज्ञा कविने केली आहे. | | |
| | ब) | दुष्टांचा दुष्टपणा नष्ट व्हावा, प्राणीमात्रात जिव्हाळ्याचे संबंध निर्माण<br>व्हावेत, पापाचा अंधार नष्ट व्हावा आणि ज्याची जी इच्छा होईल ते त्याला प्राप्त व्हावे असे दान ज्ञानेश्वरांनी देवाकडे मागितले आहे. | | |
| | क) | वेलीवर फुलणारे, उमलणारे नाजूक फूल पाहून कवीला असे वाटते की, वेलीवर उमलणारी सुंदर फुले म्हणजे जणू एखादसा प्रियेच्या मनात<br>फुलून येणारी प्रेमभावनाच आहे | | |
| | ड) | रणांगणावर जाणाऱ्या पतीच्या वियोगाचे दुःख पत्नी आपल्या मनात ठेवून पत्नी हसतमुखाने आपल्या पतीला निरोप देत आहे. दुःखाने आपल्या डोळ्यातून येणारे आश्रु, हुंदका आवरून तो सांगते की तुम्ही आनंदाने जा, घराची काळजी करू नका. | | |
| | प्र. ३० | कोणतेही तीन प्रश्न | | ९ |
| | अ) | स्वभाषेच्या विकासाची बरीच जबाबदारी लो. टिळक सुशिक्षितांवर टाकतात. विद्वानांनी विपुल ग्रंथ लिहिले पाहिजेत. लोकांना मराठी भाषेतून ज्ञान दिले पाहिजे. सुशिक्षितांनी सर्वसामान्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण केली पाहिजे. ही कामे त्यांनी मनापासून स्वभाषेच्या प्रेमापोटी करून आपली मराठी भाषा समृद्ध केली पाहिजे असे टिळकांना वाटते. | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | ब) | सुरवातीला बदकाने इतरांच्या बोलण्यावर विश्वास ठेवून स्वतःला दुःखी केले.<br>पण तो स्वतः सुंदर राजहंस आहे हे कळल्यावर त्याचा आत्मविश्वास जागा<br>झाला आणि भिती दूर पाळली. माणसाच्या जीवनातही असे प्रसंग येताल की तो स्वतःला इतरांपेक्षा कमी लेखतो. आत्मनिरीक्षण आणि आत्मबोध घेतला तर स्वतःचे सामर्थ्य आणि मर्यादा यांचे भान मानवाला येते हेच विशेष कवीने बदकाच्या उदाहरणातून सांगितले. | | |
| | क) | शेतकरी साधारणपणे चानिस वर्षाचा आहे. त्याच्या डोक्याला पागोटे त्यावर रुमाल बांधलेला आहे. अंगात बंडी व गुडघ्यापर्यंत विजार आहे. पायात सातारी जोडा व खांदयावर पिशवी आहे. शेतक-याचा रंग गोरा व डोळे घारोळे आहे. कपाळ मोठे तर हात कांबीसारखे मजबूत आहेत. पायाला भेगा पडल्यामुळे शेतकरी लंगडत चालला आहे. शेतसारा भरण्यासाठी मुदतवाद न मिळल्यामुळे तो खचून गेला आहे. | | |
| | ड) | दलित समाजाने शतकांचा म्हणजे शेकडो वर्षांचा सूर्याकडे पाठ फिरवून<br>केला आहे असे कवी म्हणतो. सूर्य हे ज्ञानाचे, प्रकाशाचे आणि समृद्ध जीवनाचे प्रतीक आहे. त्याच्याकडे पाठ फिरवून दलित समाज अज्ञान व अन्याय यांचे दुःखी जीवन जगत आला आहे. त्याचा हा प्रवास म्हणजे अज्ञानाच्या अंधाराचा दुःखमय असा प्रदीर्घ प्रवास होता असे कवीला वाटते | | |
| | प्र.३१ अ) | वाचताना कोठे, कि व कसे थांबावे हे करण्यासाठी जी वेगवेगळी चिन्हे लेखनात वापरतात त्यांना विरामचिन्हे | | ४ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | असे म्हणतात.<br>पूर्णविराम, स्वल्पविराम, अर्धविराम, प्रश्नचिन्ह, अवतरण चिन्ह, उद्गारचिन्ह ही सर्व विरामचिन्हे होय. | | |
| | अ) | विरुध्दार्थी शब्द | २ | |
| | | 1) आयात-निर्यात 3) सुंदर - कुरूप | | |
| | | २) स्वतंत्र - परतंत्र ४) सत्य -असत्य | | |
| | ब) | समानार्थी शब्द | २ | |
| | | १) तोंड - मुख, वदन | | |
| | | २) पैसा- किस दव्य संपत्ती | | |
| | प्र.३२ | अ)म्हणीचा अर्थ | २ | ४ |
| | | १) इकडे आठ तिकडे विहीर - सगळीकडून अडचणी येणे | | |
| | | २) कामापुरता मामा - काम साधण्यापुरते गोड बोलणे | | |
| | | शब्दसमूहाबद्दल एक शब्द | | |
| | | १) शंभर वर्ष आयुष्य लाभलेला -शतायुषी | | |
| | | २) आजिबात शत्रु नसलेला - अजातशत्रू | | |
| | ब | आत घालणे - आवर घालणे - व्यसनाधीन राजूला कोणीतरी आळा घातला पाहिजे | अर्थ १ + उपयोग१<br>२ | |
| | प्र.३३ | गद्य | | ३ |
| | | १) ज्याचे मन सत्याने पवित्र झाले आहे तो जगातील सर्वात पवित्र माणूस निर्दोष आणि उद्योगी जीवनामुळे मनुष्यास आरोग्य व संपत्ती लाभते | | |
| | | २) धैर्यशील मनुष्याची वैशिष्ट्ये म्हणजे लो हालअपेष्टा सहन करतो आणि संकटावर मात करतो आळशी माणूस हा समाजाचा शत्रू बनतो | | |
| | | ३)उद्योगी आणि शुध्द चारित्र्याचा माणूस गरिबांचा वाली | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | असतो | | |
| | प्र.३४ | पद्यांश | | ३ |
| | | १) या जगण्यावर शतदा प्रेम करावे वारा चंचल आहे<br>वारा चंचल आहे | | |
| | | २) हिरवे हिरवे प्राण असल्याप्रमाणे पाती रुजून आली आहेत<br>फुले लाजरी आहेत | | |
| | | ३) ही कावला मंगेश पाडगावकर यांनी लिहीली आहे. | | |
| | प्र. ३५ | सारांश लेखन - शीर्षक - दलितांचे देव<br>बाबासाहेबांचा जन्म १४ एप्रिल १८९१ साली अस्पृश्य समाजात झाका<br>त्यांचे पूर्ण नाव भीमराव रामजी आंबेडकर. त्यांचे उच्च शिक्षण परदेशात<br>झाले. लंडन विद्यापीठातून ते बॅरिस्टर झाले. शोषित वंचित अशा<br>अस्पृश्य दलित समाजासाठी त्यांचे अमूल्य कार्य, शिका, संघटित व्हा<br>आण संघर्ष करा हे त्यांचे घोषवाक्य भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार | | ४ |
| | प्र.३६ | पत्रलेखन- | | ५ |
| | | १)पत्रलेखकाचे नाव, पत्ता तारीख | १ | |
| | | २) ज्याला पाठवायचे त्याचे नाव, पद, संबोधन, अभिवादन | १ | |
| | | ३) पत्राचा विषय / मजकूर | २ | |
| | | ४) समारोप | १ | |
| | | निबंध लेखन | | ६ |
| | | १) प्रारंभ / प्रस्तावना | १ | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | २) विषय वस्तु | २ | |
| | | ३) भाषाशैली/योग्य लेखन | २ | |
| | | ४) समारोप | १ | |

(स्मिता एस. तुपे)